**ठळक बातम्या**

- तरुणांच्या क्षमतेमुळे भारत लवकरच विकसित होईल, असा प्रधानमंत्र्यांना विश्वास, राष्ट्रीय युवा दिनानिमित्त साधला युवानेत्यांशी संवाद

- आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत विरोधी पक्षांना एकही जागा मिळणार नाही असं नियोजन करण्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचं शिर्डीतल्या भाजपा अधिवेशनात कार्यकर्त्यांना आवाहन

- एस टी महामंडळाच्या ताफ्यात यंदा अडीच हजारांहून जास्त स्वमालकीच्या नव्या बसगाड्या दाखल होणार

- राजमाता जिजाऊंची जयंती राज्यभरात उत्साहात साजरी

**आणि**

- महिला क्रिकेटमधे दुसऱ्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यात भारताचा आयर्लंडवर ११६ धावांनी विजय

**<><><><><>**

तरुणांच्या क्षमतेमुळे भारत लवकरच विकसित होईल, असा विश्वास प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला आहे. त्यांनी आज स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीदिनी साजऱ्या केल्या जाणाऱ्या राष्ट्रीय युवा दिनानिमित्त नवी दिल्लीत भारत मंडपम इथं आयोजित कार्यक्रमात युवा नेत्यांशी संवाद साधला. भारतातले तरुण उल्लेखनीय परिवर्तन घडवून आणत आहेत, आपला तरुण पिढीवर विश्वास असून तरुणांकडे प्रत्येक अडचणीचं उत्तर आहे, असे गौरवोद्गार प्रधानमंत्र्यांनी काढले. महत्त्वाकांक्षी उद्दिष्टं साध्य करण्यासाठी देशातल्या प्रत्येक नागरिकाचा सक्रिय

सहभाग आणि सामूहिक प्रयत्न आवश्यक आहे, असं मोदी म्हणाले. यासाठी मोठी स्वप्नं पाहायला हवीत असं त्यांनी सांगितलं….

**मोदी बाईट होल्ड (२० सेकंद)**

विकसित भारत हा आर्थिक, सामरिक, सामाजिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या सक्षम असेल, असं ते म्हणाले. गेल्या १० वर्षात २५ कोटी लोक गरीबी रेषेच्या वर आले असून भारत ५ ट्रिलियन अर्थव्यवस्थेकडे झपाट्यानं वाटचाल करत आहे. पुढच्या दहा वर्षात देशाची अर्थव्यवस्था १० ट्रिलियनचा टप्पा पार करेल, असा आशावाद त्यांनी व्यक्त केला.

यावेळी प्रधानमंत्र्यांनी स्वामी विवेकानंद यांचं स्मरण केलं. देशातल्या तरुणांवर स्वामी विवेकानंदांचा खूप विश्वास होता, त्यामुळे तरुण विकसित भारताचं स्वप्न नक्कीच पूर्ण करतील असं प्रधानमंत्री म्हणाले. या उपक्रमाद्वारे ज्या सूचना आणि कल्पना तरुण नेत्यांकडून केल्या जातील, त्या राष्ट्रीय धोरणात समाविष्ट केल्या जातील अशी घोषणा यावेळी प्रधानमंत्री मोदी यांनी केली. एक लाख नव्या तरुण लोकांना राजकारणात आणण्याचा मोदी यांनी यावेळी पुनरुच्चार केला.

विकसित भारत यंग लीडर्स डायलॉग या कार्यक्रमाला १० जानेवारीपासून सुरुवात झाली. प्रधानमंत्री मोदी यांनी देशभरातल्या जवळपास तीन हजार युवा नेत्यांशी संवाद साधला. तसंच दहा विषयांवरल्या सर्वोत्कृष्ट निबंधांच्या संकलनाचं प्रकाशन केलं.

**<><><><><>**

**आगामी** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत विरोधी पक्षांना एकही जागा मिळणार नाही असं नियोजन करण्याचं आवाहन भाजपाचे ज्येष्ठ नेते, केंद्रीय गृहमंत्री **अमित शहा** यांनी भाजपा कार्यकर्त्यांना केलं. प्रदेश भाजपाच्या शिर्डी इथं

झालेल्या अधिवेशनात ते बोलत होते. महाविकास आघाडी तुटण्याच्या मार्गावर आहे, असं सांगत शहा यांनी शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांच्यावर कठोर टीका केली. राज्याला अस्थिरतेतून बाहेर काढून एक मजबूत स्थिर सरकार देण्याचं काम जनतेनं केलं असंही अमित शहा म्हणाले.

**विधानसभा** निवडणुकीत पक्षाला मोठा विजय मिळाला असला तरी गाफील राहून चालणार नाही. कंबर कसून पुन्हा एकदा मैदानात उतरायचं आहे, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस म्हणाले. सरकारचे कार्यक्रम समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवायचे आहेत, असं ते म्हणाले. येत्या तीन चार महिन्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार असून या निवडणुकीतही विधानसभेसारखाच विजय मिळवायचा आहे असा विश्वास फडनवीस यांनी व्यक्त केला.

**विधानसभा** निवडणुकीत राज्यातल्या जनतेनं शिवशाही स्थापन करण्यासाठी अभूतपूर्व यश दिलं आहे. भाजपाच्या आतापर्यंतच्या इतिहासाचं हे सुवर्णशिखर आहे, असं भाजपाचे ज्येष्ठे नेते, केंद्रीय मंत्री **नितीन गडकरी** म्हणाले. केवळ सरकार बदलणं नाही तर समाज बदलणं हे भाजपाचं उद्दिष्ट आहे. महाराष्ट्राचं सुराज्यात रुपांतर करणं हे आपलं कर्तव्य आहे, असं गडकरी यांनी सांगितलं.भविष्यातला महाराष्ट्र बनवायचा संकल्प आज आपण करू, असं आवाहन त्यांनी केलं. **विधानसभा** निवडणुकीत राज्यातल्या जनतेने विजयी कौल दिल्याबद्दल त्यांचे आभार मानण्यासाठी हे अधिवेशन आहे, असं भाजपा प्रदेशाध्यक्ष **चंद्रशेखर बावनकुळे** यावेळी म्हणाले.

अधिवेशनाच्या सुरुवातीला मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या हस्ते दीपप्रज्वलन झालं. त्यानंतर महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, प्रदेश कार्याध्यक्ष

रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते ध्वजारोहण झालं. तसंच राजमाता जिजाऊ, स्वामी विवेकानंद, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचं पूजन करण्यात आलं.

**<><><><><>**

राज्य परिवहन महामंडळाच्या ताफ्यात या वर्षी अडीच हजारांहून जास्त स्वमालकीच्या नव्या बसगाड्या दाखल होत असून याद्वारे राज्याच्या प्रत्येक रस्त्यावर नवी एसटी धावताना दिसेल, असं प्रतिपादन राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केलं आहे. ते आज ठाणे इथं राष्ट्रीय रस्ता सुरक्षा अभियानाच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते. याप्रसंगी १७ नव्या गाड्यांचं लोकार्पणही झालं. स्वच्छतेसह सुरक्षित प्रवासाला महत्त्व देत एकूणच परिवहन सेवेचं चित्र बदलण्याचा आराखडा बनवला जात असून टप्प्याटप्प्यानं एसटीच्या आधुनिकीकरणाला सुरुवात होईल असं सरनाईक म्हणाले.

**<><><><><>**

राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त **राज्यपाल** सी.पी, राधाकृष्णन यांनी आज राजभवनात राजमाता जिजाऊंच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करुन अभिवादन केलं.

राष्ट्रमाता जिजाऊचं जन्मस्थळ असलेल्या **बुलढाणा** जिल्ह्यातल्या सिदखेडराजा इथं केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी सपत्निक महापुजा केली.

**परभणी**तल्या जिजाऊ मंदीरात काल म्हणजे जन्मोत्सवच्या पुर्वसंध्येला दीपोत्सव साजरा झाला तसंच आज दिवसभर विविध कार्यक्रमांचं आयोजन केलं होतं.

**जालना** शहरात सर्वपक्षीय नागरिक जयंती उत्सव समितीने राजमाता जिजाऊ जयंती साजरी केली. यावेळी छत्रपती संभाजी महाराज पुतळ्यापासून

छत्रपती शिवाजी महाराज स्मारकापर्यंतच्या दुचाकी रॅलीत मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे, आमदार अर्जुन खोतकर तसंच नागरिक सहभागी झाले होते.

**वाशिम** जिल्हाधिकारी कार्यालयातील राजे वाकाटक सभागृहात सहाय्यक अधीक्षकानी राजमाता जिजाऊंच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केलं.

**नाशिक**च्या महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठात राजमाता जिजाऊंची जयंतीनिमित्त जिजाऊंच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आलं.

**बीड** शहरात राजमाता जिजाऊंच्या अर्धाकृती पुतळ्याला नागरिकांनी अभिवादन केलं. यावेळी लेझीम पथकाचा कार्यक्रमही झाला.

**<><><><><>**

**स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त राज्यपाल** सी.पी, राधाकृष्णन यांनी आज राजभवनात विवेकानंदाच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून अभिवादन केलं.

माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या केंद्रीय संचार ब्यूरोचं सोलापूर कार्यालय आणि विवेकानंद केंद्रांची सोलापूर शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय युवा दिनानिमित युवा संवाद कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. राष्ट्रीय युवा दिनानिमित झालेल्या व्याख्यानावर आधारित प्रश्न मंजुषा स्पर्धा यावेळी घेण्यात आली.

**<><><><><>**

महिला क्रिकेटमधे राजकोट इथं आज झालेल्या दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात भारतानं आयर्लंडवर ११६ धावांनी विजय मिळवला. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना भारतानं निर्धारित ५० षटकात ५ गड्यांच्या मोबदल्यात

३७० धावा केल्या. जेमिमा रॉड्रिग्जनं तडाखेबंद शतकी खेळी केली. तिनं ९१ चेंडूत १०२ धावा केल्या. हर्निल देओल ८९, स्मृती मंधना ७३, तर प्रतिका रावलनं ६७ धावा केल्या. या धावसंख्येचा पाठलाग करताना आयर्लंडला ७ गडी गमावून २५४ धावांपर्यंतच मजल मारता आली. आयर्लंडच्या क्रिस्टीना कोल्टर रॅलीनं ८० धावा केल्या भारतातर्फे दिप्ती शर्मानं ३ प्रिया मिश्रा २, तर टायट्स साधू आणि सायली सातघरेनं प्रत्येकी १ बळी मिळवला.

**<><><><><>**

ऑस्ट्रेलियात मेलबर्न इथं आज सुरु झालेल्या ऑस्ट्रेलियन खुल्या टेनिस स्पर्धेत भारताच्या सुमित नागलचं आव्हान पहिल्याच दिवशी संपुष्टात आलं. सुमित नागलला झेक रिपब्लिकच्या टॉमस मचाककडून ३-६, १-६, ५-७ असा पराभव पत्करावा लागला.

**<><><><><>**

**र**त्नागिरी इथं आयोजित  तिसऱ्या सागर महोत्सवाचा आज  समारोप झाला. आसमंत बेनेव्होलन्स फाउंडेशननं आयोजित केलेल्या या महोत्सवात सागराचं महत्त्व उलगडणारी तज्ज्ञांची व्याख्यानं, प्रात्यक्षिकं आणि अभ्यासफेऱ्या आयोजित करण्यात आल्या होत्या.

**<><><><><>**

गेल्या चोवीस तासात, मध्य महाराष्ट्रात काही ठिकणी तर मराठवाड्यात तुरळक ठिकाणी किमान तापमानात लक्षणीय वाढ झाली सर्वात कमी किमान तापमान जळगाव इथं १३ अंश सेल्सिअस इतकं नोंदवलं गेलं. येत्या दोन दिवसात, राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे.

***//<><><><><>//***